# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

**मराठी विभाग – विद्यापीठस्तरीय मुद्रितशोधन कार्यशाळा**

# मुद्रितशोधक म्हणून व्यावसायिक संधी

## डॉ. खैरे यांचे मत

**राजगुरुनगर : प्रतिनिधी**

वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तकनिर्मिती क्षेत्र; तसेच मराठी भाषेत लिहिलेला कोणताही मजकूर नियमानुसार तपासण्यासाठी मुद्रितशोधनतज्ज्ञाची आवश्यकता असते. मराठी भाषेच्या लेखनविषयक नियमांची माहिती करून घेतल्यास मुद्रितशोधनाचे नवे दालन व्यवसाय म्हणून खुले होऊ शकेल, असे प्रतिपादन पुण्याच्या एसएनडीटी महिला विद्यापीठातील डॉ. मनीषा खैरे यांनी केले.

विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मराठी विभाग, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने २० ते




**हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. मनिषा खैरे**

२२ फेब्रुवारीदरम्यान 'प्रमाणभाषा : लेखन व मुद्रितशोधन' या विषयावरील विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटनप्रसंगी डॉ. खैरे बोलत होत्या.

या वेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते.

तीनदिवसीय कार्यशाळेत प्रथम 'मुद्रितशोधनाचे महत्त्व' या विषयावर डॉ. मनीषा खैरे यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगून, मुद्रितशोधन चिन्हांची ओळख करून दिली. लेखनव्यवहारात ऱ्हस्व, दीर्घ, स्वल्पविराम, पूर्णविराम, अनुस्वार, शब्दरचना यांना अर्थदृष्ट्या अतिशय महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले.

पुण्याच्या प्रा. गौरी गोळे-लिमये यांनी विद्यार्थ्यांना शुद्धलेखनाच्या नियमांबद्दल माहिती सांगितली. कार्यशाळेचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळाचे डॉ. विकास रासकर, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. संदीप थोरात, प्रा. प्रभाकर जगताप, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. श्वेतांबरी आल्हाट, प्रा. योगिनी राऊत यांनी केले. प्रा. साईनाथ पाचारणे यांनी सूत्रसंचालन, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक; तर प्रा. डी. एम. मारकड यांनी आभार मानले.

# मुद्रितशोधन क्षेत्रात करिअरची संधी : डॉ. खैरे



**राजगुरुनगर (ता. खेड) : प्रमाणभाषा लेखन व मुद्रितशोधन विषयावरील कार्यशाळेत बोलताना डॉ. मनीषा खैरे.**

**राजगुरुनगर, ता. २४ :** ''वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तकनिर्मिती क्षेत्र तसेच मराठी भाषेत लिहिलेला कोणताही मजकूर, मराठी भाषेच्या लेखनविषयक नियमानुसार तपासण्यासाठी योग्य मुद्रितशोधकाची आवश्यकता असल्याने या क्षेत्रात करिअरच्या संधी आहेत,'' असे प्रतिपादन पुण्याच्या एसएनडीटी महिला विद्यापीठातील डॉ. मनीषा खैरे यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी विकास मंडळ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातर्फे नुकत्याच झालेल्या प्रमाणभाषा लेखन व मुद्रितशोधन या विषयावरील तीनदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. साईनाथ पाचारणे प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते.

डॉ. खैरे म्हणाल्या, ''भाषेच्या वापरत शुद्धलेखनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वृत्तपत्र, पुस्तके, माहितिपत्रकातील मुद्रणदोष पाहिले, की भाषिक प्रशिक्षणाची नितांत गरज भासते. मात्र या बाबतीत उदासीनता आहे.''

शुद्धलेखनाचे नियम प्रत्येकाने माहिती करून घेण्याचे आवाहन पुण्याच्या प्रा. गौरी गोळे लिमये यांनी केले. डॉ. विकास रासकर, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. संदीप थोरात, प्रा. प्रभाकर जगताप, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. श्वेतांबरी आल्हाट, प्रा. योगिनी राऊत यांनी केले. प्रा. डी. एम. मारकड यांनी आभार मानले.

# भाषिक प्रशिक्षणाची नितांत गरज

## डॉ. मनिषा खैरे : राजगुरूनगरमध्ये प्रमाणभाषा लेखन व मुद्रितशोधन विषयावर कार्यशाळा

राजगुरुनगर, दि. २३ (प्रतिनिधी) - वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तकनिर्मितीक्षेत्र तसेच मराठी भाषेत लिहिलेला कोणताही मजकूर नियमानुसार तपासण्यासाठी योग्य मुद्रितशोधन तज्ज्ञाची आवश्यकता असून मराठी भाषेच्या लेखनविषयक नियमांची माहिती करून घेतल्यास मुद्रितशोधनाचे नवे दालन व्यवसाय म्हणून खुले होऊ शकेल, असे प्रतिपादन पुण्याच्या एसएनडीटी महिला विद्यापीठातील डॉ. मनिषा खैरे यांनी केले.

विद्यार्थी विकास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मराठी विभाग, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने २० ते २२ फेब्रुवारीदरम्यान आयोजित करण्यात आलेल्या प्रमाणभाषा लेखन व मुद्रितशोधन या विषयावरील विद्यापीठस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या. यावेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते. डॉ. मनीषा खैरे म्हणाल्या, भाषेच्या वापरत शुद्धलेखनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वृत्तपत्र, पुस्तके, माहितीपत्रकातील मुद्रणदोष्र पाहिले की, भाषिक प्रशिक्षणाची नितांत गरज निर्माण झाली आहे. मात्र या बाबतीतील उदासीनतेला आपण सगळेच जबाबदार आहोत. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रमाणभाषा व शुद्धलेखन या गोष्टी समाजाच्या निकोप बौद्धिक व्यवहारासाठी व वाढीसाठी आवश्यक असल्याचे मत मांडले.

प्रा. साईनाथ पाचारणे यांनी प्रमाणभाषा लेखन या विषयावर बोलताना शब्दोच्चार, शब्दलेखन आणि वाक्यरचना या तीनही आघाड्यांवर भाषेच्या व्याकरणाचे लेखनस्वरूपात अचूक पालन करणे गरजेचे असल्याचे सांगून त्यांनी शुद्धलेखनाच्या जोडीने मराठीमध्ये प्रमाण उच्चार व लेखनकोषांची आवश्यकता व्यक्त केली. या कार्यशाळेचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळाचे डॉ. विकास रासकर, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. संदीप थोरात, प्रा. प्रभाकर जगताप, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. श्वेतांबरी आल्हाट, प्रा. योगिनी राऊत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. साईनाथ पाचारणे, प्रास्ताविक कार्यशाळेचे समन्वयक डॉ. संजय शिंदे तर आभार प्रा. डी. एम. मारकड यांनी मानले.

### शुद्धलेखनाचे नियम माहिती करून घ्यावेत

तीन दिवसीय कार्यशाळेत प्रथम मुद्रितशोधनाचे महत्त्व या विषयावर डॉ. मनीषा खैरे यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगून मुद्रितशोध चिन्हांची ओळख करून दिली. लेखनव्यवहारात ऱ्हस्व, दीर्घ, स्वल्पविराम, पूर्णविराम, अनुस्वार, शब्दरचना यांना अर्थदृष्ट्या अतिशय महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. पुण्याच्या प्रा. गौरी गोळे लिमये यांनी विद्यार्थ्यांना शुद्धलेखनाच्या नियमाबद्दल माहिती सांगितली. शुद्ध व नियमांना अनुसरून असलेले लेखन करण्यासाठी शुद्धलेखनाचे नियम प्रत्येकाने माहिती करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले.



**राजगुरूनगर : प्रमाणभाषा लेखन व मुद्रितशोधन या विषयावरील विद्यापीठस्तरीय कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी धडे घेतले.**

# मुद्रितशोधक म्हणून व्यावसायिक संधी – डॉ. मनीषा खैरे

राजगुरुनगर : वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तकनिर्मितीक्षेत्र तसेच मराठी भाषेत लिहिलेला कोणताही मजकूर नियमानुसार तपासण्यासाठी योग्य मुद्रितशोधनतज्ज्ञाची आवश्यकता असून मराठी भाषेच्या लेखनविषयक नियमांची माहिती करून घेतल्यास मुद्रितशोधनाचे नवे दालन व्यवसाय म्हणून खुले होऊ शकेल असे प्रतिपादन पुण्याच्या एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठातील डॉ. मनिषा खैरे यांनी केले. त्या विद्यार्थी विकास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मराठी विभाग, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रमाणभाषा लेखन व मुद्रितशोधन या विषयावरील विद्यापीठस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. यावेळी प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा.दिलीप मुळूक उपस्थित होते.






डॉ. खैरे पुढे म्हणाल्या की भाषेच्या वापरात शुद्धलेखनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वृत्तपत्र, पुस्तके, माहितीपत्रकातील मुद्रणदोष पाहिले की भाषिक प्रशिक्षणाची नितांत गरज निर्माण झाली आहे. मात्र या बाबतीतील उदासीनतेला आपण सगळेच जबाबदार असल्याचे त्या म्हणाल्या. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील यांनी प्रमाणभाषा व शुद्धलेखन या गोष्टी समाजाच्या निकोप बौद्धिक व्यवहारासाठी व वाढीसाठी आवश्यक असल्याचे मत मांडले.

तीन दिवसीय कार्यशाळेत प्रथम मुद्रितशोधनाचे महत्त्व या विषयावर डॉ. मनीषा खैरे यांनी विद्यार्थांना माहिती सांगून मुद्रितशोध चिन्हांची ओळख करून दिली. लेखनव्यवहारात ऱ्हस्व, दीर्घ, स्वल्पविराम, पुर्णविराम, अनुस्वार, शब्दरचना यांना अर्थदृष्ट्या अतिशय महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले.

पुण्याच्या प्रा. गौरी गोळे-लिमये यांनी विद्यार्थ्यांना शुद्धलेखनाच्या नियमाबद्दल माहिती सांगितली. शुद्ध व नियमांना अनुसरून असलेले लेखन करण्यासाठी शुद्धलेखनाचे नियम प्रत्येकाने माहिती करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रा. साईनाथ पाचारणे यांनी प्रमाण भाषा लेखन या विषयावर बोलताना शब्दोच्चार, शब्दलेखन आणि वाक्यरचना या तीनही आघाड्यांवर भाषेच्या व्याकरणाचे लेखनस्वरूपात अचूक पालन करणे गरजेचे असल्याचे सांगून त्यांनी शुद्धलेखनाच्या जोडीने मराठीमध्ये प्रमाण उच्चार व लेखनकोशांची आवश्यकता व्यक्त केली.

या कार्यशाळेचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळाचे डॉ. विकास रासकर, डॉ. बी.डी.अनुसे, प्रा. संदीप थोरात, प्रा. प्रभाकर जगताप, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. श्वेतांबरी आल्हाट, प्रा. योगिनी राऊत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. साईनाथ पाचारणे, प्रास्ताविक कार्यशाळेचे समन्वयक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार प्रा.डी.एम. मारकड यांनी मानले.

---

पुणे, शनिवार, २४ फेब्रुवारी २०१८ MY पुणे जिल्हा उत्तर पुढारी

# मुद्रितशोधक म्हणून व्यावसायिक संधी

## डॉ. खैरे यांचे मत

राजगुरुनगर : प्रतिनिधी

वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तकनिर्मिती क्षेत्र, तसेच मराठी भाषेत लिहिलेला कोणताही मजकूर नियमानुसार तपासण्यासाठी मुद्रितशोधनतज्ज्ञांची आवश्यकता असते. मराठी भाषेच्या लेखनविषयक नियमांची माहिती करून घेतल्यास मुद्रितशोधनाचे नवे दालन व्यवसाय म्हणून खुले होऊ शकेल, असे प्रतिपादन पुण्याच्या एसएनडीटी महिला विद्यापीठातील डॉ. मनीषा खैरे यांनी केले.

विद्यार्थी विकास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मराठी विभाग, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने २० ते २२ फेब्रुवारीदरम्यान 'प्रमाणभाषा : लेखन व मुद्रितशोधन' या विषयावरील विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटनप्रसंगी डॉ. खैरे बोलत होत्या.



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. मनिषा खैरे

या वेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते.

तीनदिवसीय कार्यशाळेत प्रथम 'मुद्रितशोधनाचे महत्त्व' या विषयावर डॉ. मनीषा खैरे यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगून, मुद्रितशोधन चिन्हांची ओळख करून दिली. लेखनव्यवहारात ऱ्हस्व, दीर्घ, स्वल्पविराम, पूर्णविराम, अनुस्वार, शब्दरचना यांना अर्थदृष्ट्या अतिशय महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले.

पुण्याच्या प्रा. गौरी गोळे-लिमये यांनी विद्यार्थ्यांना शुद्धलेखनाच्या नियमांबद्दल माहिती सांगितली. कार्यशाळेचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळाचे डॉ. विकास रासकर, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. संदीप थोरात, प्रा. प्रभाकर जगताप, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. श्वेतांबरी आल्हाट, प्रा. योगिनी राऊत यांनी केले. प्रा. साईनाथ पाचारणे यांनी सूत्रसंचालन, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक; तर प्रा. डी. एम. मारकड यांनी आभार मानले.

लोकमत पुणे, बुधवार, दि. २७ फेब्रुवारी २०१९ ४

# मुद्रितशोधक म्हणून व्यावसायिक संधी : खैरे

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तकनिर्मितीक्षेत्र तसेच मराठी भाषेत लिहिलेला कोणताही मजकूर नियमानुसार तपासण्यासाठी योग्य मुद्रितशोधन तज्ज्ञाची आवश्यकता असते. मराठी भाषेच्या लेखनविषयक नियमांची माहिती करुन घेतल्यास मुद्रितशोधनाचे नवे दालन व्यवसाय म्हणून खुले होऊ शकेल, असे प्रतिपादन पुण्याच्या एसएनडीटी महिला विद्यापीठातील डॉ. मनीषा खैरे यांनी केले.

विद्यार्थी विकास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मराठी विभाग, हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या वतीने २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या प्रमाणभाषा लेखन व मुद्रितशोधन या विषयावरील विद्यापीठस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. या वेळी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते.

डॉ. मनीषा खैरे पुढे म्हणाल्या, भाषेच्या वापरात शुद्धलेखनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वृत्तपत्र, पुस्तके, माहितीपत्रकातील मुद्रणदोष पाहिले की भाषिक प्रशिक्षणाची नितांत गरज निर्माण झाली आहे. मात्र, या बाबतीतील उदासीनतेला आपण सगळेच जबाबदार असल्याचे त्या म्हणाल्या. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी प्रमाणभाषा व शुद्धलेखन या गोष्टी समाजाच्या निकोप बौद्धिक व्यवहारासाठी व वाढीसाठी आवश्यक असल्याचे मत मांडले.

तीन दिवसीय कार्यशाळेत प्रथम 'मुद्रितशोधनाचे महत्त्व' या विषयावर डॉ. मनीषा खैरे यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगून मुद्रितशोध चिन्हांची ओळख करुन दिली. लेखनव्यवहारात सर्व ऱ्हस्व, दीर्घ, स्वल्पविराम, पूर्णविराम, अनुस्वार, शब्दरचना यांना अर्थदृष्ट्या अतिशय महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. पुण्याच्या प्रा. गौरी गोळे लिमये यांनी विद्यार्थ्यांना शुद्धलेखनाच्या नियमाबद्दल माहिती सांगितली. या कार्यशाळेचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळाचे डॉ. विकास रासकर, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. संदीप थोरात, प्रा. प्रभाकर जगताप, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. श्वेतांबरी आल्हाट, प्रा. योगिनी राऊत यांनी केले.

सकाळ
सोमवार, २५ फेब्रुवारी २०१९ ५

# मुद्रितशोधन क्षेत्रात करिअरची संधी : डॉ. खैरे



राजगुरुनगर (ता. खेड) : प्रमाणभाषा लेखन व मुद्रितशोधन विषयावरील कार्यशाळेत बोलताना डॉ. मनीषा खैरे.

राजगुरुनगर, ता. २४ : "वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तकनिर्मिती क्षेत्र तसेच मराठी भाषेत लिहिलेला कोणताही मजकूर, मराठी भाषेच्या लेखनविषयक नियमानुसार तपासण्यासाठी योग्य मुद्रितशोधकाची आवश्यकता असल्याने या क्षेत्रात करिअरच्या संधी आहेत," असे प्रतिपादन पुण्याच्या एसएनडीटी महिला विद्यापीठातील डॉ. मनीषा खैरे यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी विकास मंडळ आणि हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातर्फे नुकत्याच झालेल्या प्रमाणभाषा लेखन व मुद्रितशोधन या विषयावरील तीनदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. साईनाथ पाचारणे, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते.

डॉ. खैरे म्हणाल्या, "भाषेच्या वापरात शुद्धलेखनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वृत्तपत्र, पुस्तके, माहितिपत्रकातील मुद्रणदोष पाहिले, की भाषिक प्रशिक्षणाची नितांत गरज भासते. मात्र या बाबतीत उदासीनता आहे."

शुद्धलेखनाचे नियम प्रत्येकाने माहिती करून घेण्याचे आवाहन पुण्याच्या प्रा. गौरी गोळे लिमये यांनी केले. डॉ. विकास रासकर, डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. संदीप थोरात, प्रा. प्रभाकर जगताप, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. श्वेतांबरी आल्हाट, प्रा. योगिनी राऊत यांनी केले. प्रा. डॉ. एम. मारकड यांनी आभार मानले.

केसरी पुणे, २५ फेब्रुवारी २०१९ ३

# मुद्रितशोधक म्हणून व्यावसायिक संधी : डॉ. मनीषा खैरे

राजगुरुनगर, (वार्ताहर) : वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तकनिर्मितीक्षेत्र तसेच मराठी भाषेत लिहिलेला कोणताही मजकूर नियमानुसार तपासण्यासाठी योग्य मुद्रितशोधनतज्ज्ञाची आवश्यकता असून मराठी भाषेच्या लेखनविषयक नियमांची माहिती करून घेतल्यास मुद्रितशोधनाचे नवे दालन व्यवसाय म्हणून खुले होऊ शकेल असे प्रतिपादन पुण्याच्या एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठातील डॉ. मनिषा खैरे यांनी केले. त्या विद्यार्थी विकास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मराठी विभाग, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रमाणभाषा लेखन व मुद्रितशोधन या विषयावरील विद्यापीठस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. यावेळी प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा.दिलीप मुळूक उपस्थित होते.

डॉ. मनीषा खैरे पुढे म्हणाल्या की, भाषेच्या वापरात शुद्धलेखनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वृत्तपत्र, पुस्तके, माहितीपत्रकातील मुद्रणदोष पाहिले की भाषीक प्रशिक्षणाची नितांत गरज निर्माण झाली आहे. मात्र या बाबतीतील उदासीनतेला आपण सगळेच जबाबदार असल्याचे त्या म्हणाल्या.

यावेळी विद्यार्थ्यांना मुद्रितशोध चिन्हांची ओळख करून दिली. लेखनव्यवहारात ऱ्हस्व, दीर्घ, स्वल्पविराम, पुर्णविराम, अनुस्वार, शब्दरचना यांना अर्थदृष्ट्या अतिशय महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळाचे डॉ. विलास रासकर, डॉ. बी.डी. अनुसे, प्रा. संदीप थोरात, प्रा. प्रभाकर जगताप, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. श्वेतांबरी आल्हाट, प्रा. योगिनी राऊत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. साईनाथ पाचारणे, प्रास्ताविक कार्यशाळेचे समन्वयक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार प्रा.डी.एम. मारकड यांनी मानले.

---

प्रभात पुणे

# भाषिक प्रशिक्षणाची नितांत गरज

प्रमाणभाषा ... मुद्रितशोधन विषयावर कार्यशाळा



## शुद्धलेखनाचे नियम माहिती करून घ्यावेत



जनप्रवास

शनिवार, दि. २३ फेब्रुवारी २०१९

# मुद्रितशोधक म्हणून व्यावसायिक संधी : डॉ. मनीषा खैरे

विद्यापीठस्तरीय मुद्रितशोधन कार्यशाळा

राजगुरुनगर । वार्ताहर

वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तकनिर्मितीक्षेत्र तसेच मराठी भाषेत लिहिलेला कोणताही मजकूर नियमानुसार तपासण्यासाठी योग्य मुद्रितशोधनतज्ज्ञाची आवश्यकता असून मराठी भाषेच्या लेखनविषयक नियमांची माहिती करून घेतल्यास मुद्रितशोधनाचे नवे दालन व्यवसाय म्हणून खुले होऊ शकेल असे प्रतिपादन पुण्याच्या एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठातील डॉ. मनिषा खैरे यांनी केले. त्या विद्यार्थी विकास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मराठी विभाग, हुतात्मा राजगुरु महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रमाणभाषा लेखन व मुद्रितशोधन या विषयावरील विद्यापीठस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. याप्रसंगी प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.जी.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा.दिलीप मुळूक उपस्थित होते.

डॉ. मनीषा खैरे पुढे म्हणाल्या की भाषेच्या वापरात शुद्धलेखनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वृत्तपत्र, पुस्तके, माहितीपत्रकातील मुद्रणदोष पाहिले की भाषिक प्रशिक्षणाची नितांत गरज निर्माण झाली आहे. मात्र या बाबतीतील उदासीनतेला आपण सगळेच जबाबदार असल्याचे त्या म्हणाल्या. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील यांनी प्रमाणभाषा व शुद्धलेखन या गोष्टी समाजाच्या निकोप बौद्धिक व्यवहारासाठी व वाढीसाठी आवश्यक असल्याचे मत मांडले.

तीन दिवसीय कार्यशाळेत प्रथम मुद्रितशोधनाचे महत्त्व या विषयावर डॉ. मनीषा खैरे यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगून मुद्रितशोधन चिन्हांची ओळख करून दिली. लेखनव्यवहारात ह्रस्व दीर्घ, स्वल्पविराम, पूर्णविराम, अनुस्वार, शब्दरचना यांना अर्थदृष्ट्या अतिशय महत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले.

पुण्याच्या प्रा. गौरी गोखले-लिमये यांनी विद्यार्थ्यांना शुद्धलेखनाच्या नियमाबद्दल माहिती सांगितली. शुद्ध व नियमांना अनुसरून असलेले लेखन करण्यासाठी शुद्धलेखनाचे नियम प्रत्येकाने माहिती करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रा. साईनाथ पाचारणे यांनी प्रमाणभाषा लेखन या विषयावर बोलताना शब्दोच्चार, शब्दलेखन आणि वाक्यरचना या तीनही आधारांवर भाषेच्या व्याकरणाचे लेखनस्वरूपात अचूक पालन करणे गरजेचे असल्याचे सांगून त्यांनी शुद्धलेखनाच्या जोडीने मराठीमध्ये प्रमाण उच्चार व लेखनकोशांची आवश्यकता व्यक्त केली.

या कार्यशाळेचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळाचे डॉ. विकास [illegible], डॉ. बी.डी.अनुसे, प्रा. संदीप थोरात, प्रा. प्रभाकर जगताप, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. [illegible] आल्हाट, प्रा. योगिनी राऊत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. साईनाथ पाचारणे, प्रास्ताविक कार्यशाळेचे समन्वयक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार प्रा.डी.एम. [illegible] यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख